# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६, २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**परिपत्रक**

जा.क्र.विकाऔ/लेखा-४/२०१६/ ६४८९
दिनांक : 17 OCT 2016

प्रति,
प्राचार्य / संचालक,
इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, गढी, ता. गेवराई ,जि बीड/ श्री शिवाजी इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, परभणी
श्री गुरुगोबिंदसिंघजी इन्स्टिटुयट ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, नांदेड/ नांदेड फार्मसी कॉलेज (पॉली), शाम नगर, नांदेड/आदर्श शिक्षक प्रसारक मंडळाचे डी. फार्मसी, उस्मानाबाद/ महाराष्ट्र पॉलेटेक्नीक (डी. फार्मसी) इन्स्टिटुयट, निलंगा/ चन्नबसवेश्वर फार्मसी पॉलीटेक्नीक, लातुर / कमला नेहरु पॉलिटेक्नीक (फार्मसी) औरंगाबाद

विषय :- परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती
संदर्भ :- १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.धोरण-३०११/(१६५/११)तांशि-२, दिनांक १७ जून, २०१५
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-२०१०/(६७८/१०)/विशि-१ दिनांक २५ मार्च, २०११

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, शासनाच्या संदर्भाधिन शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये राज्य शासनाने ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणा-या अधिकारी/कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. या निर्णयास अनुसरुन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेसाठी शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००७/१८/सेवा-४ दिनांक ०७/०७/२००७ अन्वये अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित केलेली आहे.

संदर्भिय शासन निर्णय क्र.१ मधील मुद्दा क्र.११ मध्ये कर्मचा-यांच्या सध्याच्या वेतनाच्या सोबत मागील थकबाकी वसुल करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. ~~केलेल्या~~ सदरील कार्यपध्दतीप्रमाणे सेवार्थ-प्रणालीमधुन वेतन देयके सादर करताना वसुली करण्यात यावी. तसेच आपल्या संस्थेतील संबंधित कर्मचा-यांना डीसीपीएस वसुलीबाबत अवगत करावे.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

सोबत- उपरोक्त संदर्भिय शा.नि.क्र.१

प्रत — या कार्यालयाचे प्रोग्रॅमर यांना देवुन कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावी.

D:\lekha 10-9-2013\DCPS/Paripatrak

**अकृषि विद्यापीठे व संलग्नित मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षणाकडील अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच सेवानिवृत्ती वेतन योजना लागू असलेली शासकीय अनुदानित अभिमत विद्यापीठे यांतील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती.**

**महाराष्ट्र शासन,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अंनियो-२०१०/(६७८/१०)/विशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२, दिनांक :- २५ मार्च, २०११.

वाचा -
१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००६/८७/सेवा-४, दिनांक १२ जानेवारी, २००७.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ७ जुलै, २००७.
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००७/६७/सेवा-४, दिनांक २८ सप्टेंबर, २००७.
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००७/६७/सेवा-४, दिनांक ३०ऑक्टोबर,२००७.
६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ३ डिसेंबर, २००७.
७) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००८/१५/सेवा-४, दिनांक ७ फेब्रुवारी, २००८.
८) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००८/१८/सेवा-४, दिनांक ११ फेब्रुवारी, २००८.
९) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. सेनिवे १००८/१६/सेवा-४, दिनांक २६ फेब्रुवारी, २००८.
१०) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००८/९३/सेवा-४, दिनांक १ डिसेंबर, २००८.
११) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००७/६९/सेवा-४, दिनांक ३० जानेवारी, २००९.
१२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००९/१४/सेवा-४, दिनांक २७ फेब्रुवारी, २००९.
१३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००९/प्र.क.३२/सेवा-४, दिनांक १८ ऑगस्ट, २००९.

**प्रस्तावना -**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये राज्य शासनाने १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणा-या अधिकारी/कर्मचा-यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. या निर्णयास अनुसरून परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेसाठी शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो-१००७/१८/सेवा-४ दिनांक ७/७/२००७ अन्वये अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित केलेली आहे.

२. राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे या योजनेची अंमलबजावणी करताना, अकृषि विद्यापीठे व संलग्नित मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी एक सर्वंकष कार्यपध्दती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासनानें पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

शासन आता असा निर्णय घेत आहे की, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासून अंमलात येईल. ज्यांना सध्याची निवृत्ती वेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ ) लागू होते अशा अकृषि विद्यापीठे व मान्यताप्राप्त अशासकीय १००% अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र

महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे इत्यादींच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बाबतीत उच्च शिक्षण, संचालनालय, तंत्र शिक्षण संचालनालय व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यासाठी स्वतंत्र उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणांची स्थापना करण्यात येत आहे. अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी अनुक्रमे संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई, संचालक (व्यशि) व संचालक (प्रशि), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई हे नियंत्रक अधिकारी म्हणून काम करतील व अनुक्रमे विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण व सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण हे उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण म्हणून काम पाहतील. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे इ.च्या सेवेत दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्या नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेसंबंधीचे लेखे व इतर संबंधित अभिलेख यांची देखभाल करेल. या योजनेच्या प्रभावी व यशस्वी अंमलबजावणीकरीता खालील कार्यपध्दती विहित करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.

२. या योजनेअंतर्गत करावयाच्या वजावटीसंबंधात खालील सर्वसाधारण सूचनांचे पालन केले जावे :-

अ) या योजनेतील स्तर - १ अंतर्गत उपरोक्त कर्मचा-यांकडून देय ठरणारे अंशदान म्हणजे मूळ वेतन अधिक महागाई वेतन (लागू असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या १०% इतकी रक्कम (रूपयाच्या अपूर्णाकात असलेली रक्कम पुढील रूपयात पूर्णांकित करून) १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यामधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या वेतन देयकातून प्रत्येक महिन्यात वसूल केली जाईल. ( ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे मूळ वेतन म्हणजे वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन होय)

ब) **या योजनेतील स्तर-२ अंतर्गत स्वेच्छेने जमा करावयाच्या अंशदानांबाबतची योजना पुढील आदेश दिले जाईपर्यंत लागू ठरणार नाही व म्हणून याबाबतची स्वेच्छेने करावयाची अतिरिक्त वसूली कर्मचा-यांच्या वेतनातून करण्यात येऊ नये.** तथापि, स्वेच्छेने जमा करावयाच्या अंशदानाबाबत वित्त विभाग जो शासन निर्णय निर्गमित करेल तो त्या आदेशाच्या दिनांकापासून लागू राहील.

क) कर्मचा-याचे अंशदान वसुल करण्याची कार्यवाही तो ज्या महिन्यात नियुक्त झालेला असेल त्याच्या पुढील महिन्याच्या वेतनातून करण्यात यावी. (उदा. जर एखादा कर्मचारी ऑगस्ट, २००७ मध्ये नियुक्त झाला असेल तर या योजनेंतर्गत त्याच्या अंशदानाची वसुली त्याच्या सप्टेंबर, २००७ या महिन्याच्या वेतनातून सुरू करण्यात यावी.)

ड) १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन)नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण)नियम, १९८४) लागू असणार नाही, तसेच सर्वसाधारण भविष्य

निर्वाह निधी योजना लागू नसल्याने त्यांच्या वेतनातून सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी संदर्भातील अंशदानाची वसुली करण्यात येणार नाही.

**३.अंमलात आणावयाची कार्यपध्दती**

कुलसचिव, अकृषि विद्यापीठे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे अभिमत विद्यापीठे / सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण व त्यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, संबंधित अकृषि विद्यापीठातील तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठातील वेतन लेखा अधिकारी, अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे प्राचार्य, अधिदान व लेखा अधिकारी मुंबई/जिल्हा कोषागार अधिकारी यांनी खालील परिच्छेदामध्ये विहीत केलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे.

**४. अकृषि विद्यापीठे व संलग्नित मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यांमधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांकडून माहिती प्राप्त करणे-**

कुलसचिव, अकृषि विद्यापीठे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे / सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी प्रत्येक अकृषि विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांकडून, त्यांच्या/तिच्या **नियमित वेतनश्रेणीतील नियुक्तीस संचालक/सह संचालक यांच्या वैयक्तिक मान्यतेच्या आदेशानंतर** लगेच, निवृत्तीवेतन लेखा क्रमांक प्राप्त करण्याचा अर्ज, सोबतच्या विहीत नमुना-१ मध्ये ५ प्रतीत संबंधित अकृषि विद्यापीठांचे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांचे कुलसचिव व महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतन/ औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे प्राचार्य यांचेमार्फत प्राप्त करून घ्यावा. नमुना-१ वर संबंधित कर्मचा-यांचे छायाचित्र लावून व अर्जाच्या अखेरीस असणा-या वचनपत्रावर अशा कर्मचा-यांची स्वाक्षरी आहे याची खातरजमा केल्यावर प्रमाणपत्र स्वाक्षरीत करून कुलसचिव/प्राचार्य यांनी ५ प्रती यथास्थिती सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांचेकडे पाठवाव्यात.

**५. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने निवृत्ती वेतन लेखा क्रमांक देणे बाबत -**

उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण, प्रत्येक १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांस एक निवृत्तीवेतन लेखा क्रमांक देईल व तो क्रमांक नमुना-१ च्या सर्व प्रतीवर नोंदविण्यात येईल. निवृत्तीवेतन लेखा क्रमांक नोंदविलेल्या नमुना-१ ची एक प्रत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांनी ठेवून घ्यावी व नमुना-१ ची प्रत दुसरी, तिसरी व चौथी प्रत यथास्थिती सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था व त्यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांचेकडे पाठवावी. सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण व त्यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक हे कर्मचाऱ्याला क्रमांक नोंदविलेली नमूना-१ ची तिसरी व चौथी प्रत संबंधित अकृषि विद्यापीठांचे तसेच राज्यातील

ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांचे कुलसचिव/महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचेकडे पाठवतील.

कुलसचिव/प्राचार्य यांनी कर्मचा-यास त्याचा निवृत्तीवेतन लेखा क्रमांक कळविणे आवश्यक आहे. सदरहू नमुना १ ची प्रत कर्मचा-यांच्या सेवापुस्तकात चिकटवून त्याची नोंद **लाल शाईने** सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठावर घेण्यात यावी. नमुन्याची चौथी प्रत संबंधित कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्तीत ठेवावी.

६. **एकदा दिलेला निवृत्ती वेतन लेखा क्रमांक, संबंधित १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे, राज्यात कोठेही स्थानांतरीत झाल्यानंतरही बदलणार नाही. या क्रमांकाची नोंद संबंधित कर्मचा-याच्या वेतन देयकामध्ये संबंधित कर्मचा-याच्या नावासमोर घेण्यात यावी.**

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन लेखा क्रमांकात दोन घटक असतील. ते म्हणजे (अ)नियोक्त्याचा संकेतांक व (ब)कर्मचा-याचा संकेतांक.

७. अकृषि विद्यापीठ व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यांमध्ये नियोक्त्याचा क्रमांक खाली दर्शविल्याप्रमाणे असेल.

(i) पहिला अंक संस्थेचा प्रकार दर्शवेल.

अकृषि विद्यापीठांसाठी तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांसाठी ५ तसेच मान्यता प्राप्त अशासकीय १००% अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी पहिला अंक ५ हा असेल.

(ii) पुढील चार अंक - कोषागार / उपकोषागार यांचा सांकेताक दर्शवतील.

(iii) पुढील सहा अंक – सह संचालक, उच्च शिक्षण/सह संचालक, तंत्र शिक्षण/सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांचा आहरण व संवितरण अधिकारी म्हणून देण्यात आलेला संकेतांक.

८. १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याचा संकेतांक क्रमांक कमाल १२ अकांचा असेल आणि तो खालील प्रमाणे निश्चित करावा. हा संकेतांक क्रमांक वेतन पथकाकडील सर्व अभिलेखात वापरला जाईल.

पहिले तीन अंक - कर्मचाऱ्याची अद्याक्षरे (उदा. अबक)
नंतरचा एक अंक - पुरुष अथवा महिला (M / F)
नंतरचे दोन अंक - जन्मवर्ष दोन अंकी (उदा.६०)
नंतरचे पाच अंक - कर्मचाऱ्याचा संकेतांक ( हा ०००००१, ००००२, ००००३ याप्रमाणे असावा )

त्यानंतरचा एक अंक - हा संगणकीय अज्ञावलीने दिलेला चेक डिजिट असेल व तो आणि कर्मचारी संकेतांक संगणकीय आज्ञावली लागू झाल्यानंतर वेगळ्याने देण्यात येईल.

९. उपराज्य देखभाल अभिकरण व सह संचालक, उच्च शिक्षण, सह संचालक, तंत्र शिक्षण, सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक हे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन लेखा क्रमांक दिलेल्या कर्मचा-यांचा तपशील नमुना आर-१ मध्ये ठेवण्यात आलेल्या

नोंदवहीमध्ये नोंदवतील. अशाच प्रकारची कार्यवाही संबंधित अकृषि विद्यापीठांचे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांचे कुलसचिव/ महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे प्राचार्य यांच्या अभिलेखात त्यांचेकडील कर्मचा-यांस प्राप्त झालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन लेखा क्रमांकाचा तपशील नमुना आर-१ मध्ये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये नोंदवून कायमच्या अभिलेखात जतन करून ठेवतील.

**१०. अंशदानाची वसुली :-**

अंशदानाची वसुली अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यामधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नियमित वेतनश्रेणीच्या नियुक्तीच्या पुढील महिन्यापासून देय वेतनातून सुरू करण्यात यावी. जो कर्मचारी १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्त झाला असेल त्यास नियमित वेतन श्रेणी ज्या दिनांकास लागू केली जाईल त्या दिनांकापासून परिभाषित अशंदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

या प्रयोजनार्थ अकृषि विद्यापीठांचे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांचे कुलसचिव व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे प्राचार्य यांनी १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर नियमित वेतनश्रेणीत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या मासिक वसुलीबाबतची माहिती नमुना क्र.२ मधे भरुन ती अनुसूची मूळ वेतन देयकासोबत वेतन पथकाकडे सादर करावी. या वेतन देयकासोबत परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतंर्गत संबंधित कर्मचा-याच्या वेतनातून वसुल करण्यात येणा-या अंशदानाची कर्मचारीनिहाय वसुली दर्शविणारी स्वतंत्र अनुसूची नमुना-२ मध्ये जोडण्यात यावी. त्या अनुसूचीमध्ये (नमुना-२) कर्मचा-यांच्या अंशदानाची रक्कम स्वतंत्र स्तंभात दर्शवावी. कुलसचिव/प्राचार्य यांनी कार्यालयाच्या स्तरावर नमुना-२ च्या ३ प्रती प्रत्येक वेतन देयकासोबत न चुकता जोडाव्यात. तसेच वेतनदेयकात या योजनेखालील प्रत्येक कर्मचा-यांच्या नावांसमोर वसुलीची रक्कम दर्शवावी. या योजनेखालील सर्व कर्मचा-यांच्या मासिक वेतन देयकातून केलेल्या कपातीची रक्कम सह संचालक, उच्च शिक्षण/सह संचालक, तंत्र शिक्षण/ सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेत चलनाने न चुकता देयक पारित झाल्याच्या दिनांकापासून सात कामाच्या दिवसांच्या आत कोअरबँकींग पध्दतीव्दारे जमा करावी.

अशा प्रकारे कर्मचा-यांच्या वेतनातून वसूल केलेल्या या योजनेखालील रकमा वेगवेगळ्या चलना द्वारे जमा केल्यावर त्या चलनाच्या बँकेच्या शिक्क्याच्या दोन प्रती कुलसचिव/प्राचार्य यांनी उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे रक्कम भरणा केल्याच्या दिनांकापासून सात कामाच्या दिवसाच्या आंत पाठवाव्यात. अशा प्रत्येक चलनासोबत एकत्रित नमुना क्रमांक आर २ ची प्रत जोडावी. अशा सर्व चलनांची नोंद नमुना क्रमांक आर-२ या नोंदवहीत करुन उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने प्रत्येक महिन्यात कुलसचिव/प्राचार्य यांचेकडून प्राप्त होणारी एकूण रक्कम संबंधित नियंत्रकांकडे कोणत्याही परिस्थितीत पुढील महिन्याच्या पाच तारखेपर्यंत विहीत नमुन्यात कळवावी. नियंत्रकानी सदर नोंदवही विद्यापीठे व महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालय निहाय वेगळी ठेवावी.

**११. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पासून सुरू झालेल्या मागील कालावधीची वसुली -**

मागील कालावधीतील वसुलीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील:-

अ) कर्मचा-यांच्या सध्याच्या वेतनाच्या महिन्यातील अंशदानाच्या वसुलीसोबत त्याच्या लगतपूर्वीच्या ज्या महिन्याची वसुली करणे बाकी असेल त्या महिन्यापासून थकबाकी वसुल करण्यात यावी.

ब) पुढील महिन्यामध्ये वेतनातून नियमित अंशदान वसुलीसोबत थकबाकी वसुली वरील प्रमाणे उलटया क्रमाने करण्यात यावी. प्रत्येक महिन्याच्या अंशदानासाठी स्वतंत्र अनुसूची जोडण्यात याव्यात.

क) प्रत्येक कर्मचा-याबाबत अंशदानाची सर्व थकबाकी पूर्णपणे वसूल होईपर्यंत अशा प्रकारे अंशदानाच्या दोन हप्त्याची वसुली सुरू ठेवावी.

उदा. कर्मचा-यांची नियुक्ती डिसेंबर, २००५ मध्ये करण्यात आली असेल तर त्याच्या अंशदानाची वसूली खालीलप्रमाणे करण्यात येईल:-

१) फेब्रुवारी, २०१० मध्ये दिल्या जाणा-या वेतनासाठी -माहे जानेवारी, २०१० चे अंशदान (जे फेब्रुवारी, २०१० मध्ये दिले जाणार आहे) + माहे डिसेबर, २००९ च्या अंशदानाची वसूली किंवा उलटया क्रमाने ज्यालगत पूर्वीच्या महिन्याची वसूली करणे बाकी आहे त्या महिन्याची थकबाकी.

२) मार्च, २०१० मध्ये दिल्या जाणा-या वेतनासाठी -माहे फेब्रुवारी, २०१० चे अंशदान (जे मार्च, २०१० मध्ये दिले जाणारआहे ) + माहे नोंव्हेबर, २००९ च्या अंशदानाची वसूली किंवा उलटया क्रमाने ज्यालगत पूर्वीच्या महिन्याची वसूली करणे बाकी आहे त्या महिन्याची थकबाकी.
यांप्रमाणे उलट्या क्रमाने जानेवारी, २००६ पर्यंत सुरु ठेवावी.

**१२. सह संचालक, उच्च शिक्षण/सह संचालक, तंत्र शिक्षण/सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण व अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, यांनी वेतनदेयकास मान्यता देणे बाबत**

अकृषि विद्यापीठे व मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यांचे परिपूर्ण वेतन देयक सह संचालक, उच्च शिक्षण/ सह संचालक, तंत्र शिक्षण/ सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या कार्यालयातील अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी संमत करताना विहित लेखा शीर्षाखाली वसुलीची रक्कम प्राप्त झाल्याचे दर्शवावे व नमुना २ ची एक प्रत वेतन देयकापासून काढून घ्यावी. त्यातील माहिती नमुना आर २ मध्ये एकत्रित करावी. ती माहिती नमुना-२ मधील अनुसूचीसोबत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे ठेवावी. तसेच नमुना-आर-२ मध्ये नोंद करुन त्यात दर्शविल्यानुसार संबंधित रकमा प्रत्येक कर्मचा-यांच्या खात्यात नमुना क्रमांक ५ मधे जमा कराव्यात, त्याचे काटेकोरपणे पालन केले जावे. जेथे शक्य आहे तेथे नमुना २ ची माहिती संगणकीय प्रणालीव्दारे तयार करावी व त्या मुद्रित प्रतीवर स्वाक्षरी करून त्या देयकासोबत जोडाव्या. त्याचप्रमाणे अकृषि विद्यापीठे व महाविद्यालय/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठनिहाय नमुना आर-२ मधील आणि कर्मचा-यांकडून केलेल्या वसुलीच्या रकमेचा भरणा केल्यानंतर चलनासोबतच्या नमुना क्रमांक २ ची पडताळणी करुन खात्री करावी व नोंदवहीत नोंदवावी.

**१३. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने माहितीचे एकत्रिकरण करण्याबाबत-**

कुलसचिव/प्राचार्य यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीची नोंद उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून नमुना आर-२ नुसार ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये घेतली जाईल. सदर नोंदी अकृषि विद्यापीठ/ महाविद्यालय/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण

संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालय तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठनिहाय, महिनानिहाय ठेवाव्यात. एकूण प्राप्त रक्कमांचा मेळ घातल्यानंतर उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण नियोक्त्यांचे अनुरुप अंशदान जमा करण्यासाठी प्रत्येक महिन्यात नमुना क्र.४५ अ (simple receipt form) मधे एक देयक कोषागाराकडे शासनाच्या अंशदानाच्या रक्कमा जमा करण्याच्या कार्यवाहीसाठी पाठवेल.

सर्व संबंधीत अकृषि विद्यापीठे/अशासकीय अनुदानित महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या एकूण रकमेसंबंधी एक देयक तयार करण्यात येईल. या देयकात ज्या कर्मचा-यांच्या रक्कमा जमा करावयाच्या आहेत त्यांची यादी देयकात अंतर्भूत करण्याची आवश्यकता नाही. तथापि, उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण केवळ देयकात दर्शविण्यात आलेली रक्कम अचूक/बरोबर आहे असे प्रमाणित करेल. **याशिवाय सममुल्य रक्कम खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करण्यासाठी एक चलन उपरोक्त देयकासोबत जोडण्यात येईल. अशारितीने अधिदान व लेखाअधिकारी मुंबई वेतन व देयके यांना पाठविण्यात येणारे देयक ''निरंक'' रक्कमेचे असेल.**

१४. परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून द्यावयाचा नियोक्त्यांचा सममूल्य अशंदानाबाबतचा खर्च खालील लेखाशीर्षाखाली नोंदविण्यात यावा.

अ) मागणी क्रमांक जी - ६

प्रधान शीर्ष " **२०७१- निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ**
**०१- नागरी**
**११७-परिभाषित निवृत्ती वेतन योजनेंअंतर्गत शासनाचे अंशदान**
**(०१) शासनाचे अंशदान**
**(०१) (०४)- निवृत्ती वेतनावरील खर्च, (२०७१०६४२)**
**०४, निवृत्ती वेतन विषयक खर्च "**

ब ) उपरोक्त लेखाशिर्षाखाली उच्च शिक्षण विभागाकडून अनुदान प्राप्त करुन देण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण/ सह संचालक, तंत्र शिक्षण/ सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांची राहील. अशाप्रकारे पुस्तकी समायोजनाद्वारे निरंक देयक कोषागाराकडून पारित झाल्यानंतर शिक्षण विभागाचा हिस्सा उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांनी संबंधित कर्मचा-यांच्या लेख्यात जमा दर्शवावा.

क) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अंशदानाची तसेच व्यवस्थापनाच्या अंशदानाची शासन अनुदानातून दिली जाणारी रक्कम शासनास भरणा केल्याबद्दल कुलसचिव/प्राचार्य यांनी संबंधित कोषागाराकडून प्रमाणित करुन घ्यावी व त्या प्रमाणपत्राच्या प्रती उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे दरमहा पाठवाव्यात. प्रमाणपत्र यासोबत जोडलेल्या नमुना क्र.७ मधे प्राप्त करावे. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने कर्मचाऱ्यांकडून जमा झालेल्या व शासन खाती जमा केलेल्या रकमांच्या चलनाच्या प्रती नमुना आर २ मधील माहितीसह नियंत्रकांना पाठवाव्यात. तसेच नियोक्त्याचे शासन अनुदानातून दिले जाणारे अशंदान भरणा केल्यानंतर त्या चलनांच्या प्रतीही नियंत्रक यांच्याकडे न चुकता पाठवाव्यात. नियंत्रकानी उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणनिहाय माहिती महिनानिहाय एकत्रित करुन अशी एकत्रित माहिती उपसचिव (अर्थसंकल्प), उच्च शिक्षण विभाग आणि राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, मुंबई यांच्याकडे प्रत्येक महिन्यात न चुकता पाठवावी.

**१५. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने माहिती अद्ययावत ठेवणे बाबत-**

उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण त्यांचेकडील माहिती प्रत्येक महिन्यात अद्ययावत करेल आणि जमा न झालेल्या रक्कमा व न जुळणा-या रक्कमा इत्यादी बाबतचे आक्षेप अहवाल तयार करील.

१६.	उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांनी या योजनेखालील लेखे नमुना क्र.४,५,६ मध्ये ठेवावेत. याच पध्दतीने राज्यातील सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे व प्राचार्य यांच्या कार्यालयातील अधीक्षक यांनी आपल्याकडील या योजनेचे अभिलेख प्रत्येक महिन्यात कर्मचारी निहाय पडताळून त्याचा मासिक अहवाल संबंधित विभागीय शिक्षण सह संचालकांकडे दरमहा १५ तारखेपूर्वी सादर करावा. विभागीय शिक्षण सह संचालक/ सह संचालक, तंत्र शिक्षण/ सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सदर अहवालाचे अंतर्गत लेखा परिक्षण करून स्पष्ट अभिप्रायासह संबंधित शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे/ संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ संचालक (व्यशि) व संचालक (प्रशि), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई यांना अहवाल २१ तारखेपर्यंत सादर करतील व संबंधित संचालक आपला एकत्रित अहवाल राज्य शासनास दरमहा ३० तारखेपर्यंत सादर करतील.

सदरचे अहवाल सर्व स्तरावर संगणकीय पध्दतीने ई-मेल व्दारा सादर होतील. उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांनी उपरोक्त परिच्छेदामधील कार्यवाही पूर्ण केल्यानंतर या संदर्भातील प्रत्येक महिन्याची माहिती (देयक क्रमांक, एकूण अनुरुप अनुदानाची मासिक रक्कम, प्रमाण क्रमांक व दिनांक) नियंत्रक अधिका-यांना पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत न चुकता पाठवावी. नियंत्रक अधिकारी यांनी अशी सर्व माहिती विहीत नमुन्यात एकत्रित करुन सह संचालकनिहाय दर्शवून ती शासनास पाठवावी.

**१७. ताळमेळ -**

अकृषि विद्यापीठे व महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/ औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यांचेशी संबंधित अधिक्षक यांनी कर्मचारीनिहाय अंशदान रक्कमेचा ताळमेळ उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाच्या सहमतीने नियमित स्वरूपात करावा. या बाबत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण कुलसचिव/प्राचार्य/अधीक्षक, वेतन पथक यांना सर्वस्वी जबाबदार ठरविण्यात येत आहे.

**१८. अंशदानावरील व्याज -**

(अ)	जमा झालेल्या रक्कमांवरील व्याजाचा दर व व्याजाची परिगणना करण्याची कार्यपध्दती ही वित्त विभागाच्या वेळोवेळी सूचना/आदेशानुसार लागू राहील. विहित दराने व्याज जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून करण्यात येईल. यासंदर्भातील माहिती उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांनी नियंत्रण अधिका-यांना पाठवावी. तसेच नियंत्रण अधिकारी यांनी यासंदर्भातील माहिती शासनास सादर करावी व त्याची प्रत राज्य अभिलेख देखभाल अभिकरण यांच्याकडे न चुकता पाठवावी.

**ब)**	याकरिता उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने नमुना क्रमांक ४५-अ (simple receipt form) मध्ये व्याजाची रक्कम आहरित करण्याकरीता देयक संबंधित कोषागारात सादर करावे. अशा देयकासोबत ज्या कर्मचाऱ्यांच्या खाती व्याज जमा करावयाचे आहे त्या कर्मचाऱ्यांची यादी जोडण्याची आवश्यकता नाही. तथापि, रक्कम अचूक असल्याची खात्री केल्याबाबत उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने देयकात प्रमाणित करावे. सदर व्याजाची रक्कम खालील लेखा शीर्षाखालील अर्थसंकल्पीय अनुदानातून आहरित करावी.

**२०४९ - व्याज प्रदाने**
**६० - इतर दायित्वांवरील व्याज**
**१०१ - ठेवीवरील व्याज**
**(००)(०५) - विद्यापीठ कर्मचाऱ्याकरीता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना**
**( २०४९----)**
**४५ - व्याज प्रदाने**

**आणि २०४९ - व्याज प्रदाने**
**६० - इतर दायित्वांवरील व्याज**
**१०१ - ठेवीवरील व्याज**

**(०१)(०५) - १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याकरीता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना**
**( २०४९----)**
**४५ - व्याज प्रदाने**

**वर नमूद केलेल्या देयकासोबत अनुरुप रकमेचे चलन खाली दर्शविलेल्या शीर्षाखाली रक्कम भरण्याकरीता जोडावे.**

**८३४२ - इतर ठेवी**
**११७ - कर्मचाऱ्यांकरीता परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना**
**(०२)(०१) - परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना**
**(८३४२५०९९)**
**४५ - शासनाचे व्याज**
**याप्रमाणे सदर देयक निरंक रकमेचे असेल**

**१९. वार्षिक विवरणपत्र**

प्रत्येक वित्तीय वर्षाचे अखेरीस उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरण नमुना आर -३ नुसार कर्मचा-यांचे लेख्याचे विवरण पत्र अकृषि विद्यापीठे/महाविद्यालये/तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांच्या कार्यालयातील अधीक्षक वेतन पथक व संबंधित अनुदानित अकृषि विद्यापीठांचे तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशा अभिमत विद्यापीठांचे कुलसचिव/महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांचे प्राचार्य यांचे मार्फत संबंधित कर्मचा-यास पाठवील. याशिवाय संगणकीय आज्ञावली विकसित करुन लागू केल्यानंतर ही माहिती उपराज्य अभिलेख देखभाल अभिकरणाच्या संकेत स्थळावर सुयोग्य परवलीच्या शब्दाचे (पासवर्ड) संरक्षण देऊन ठेवण्यात येईल.

**२०. इतर सूचना -**

स्तर १ अंतर्गत जमा झालेल्या एकूण रक्कमेतून (कर्मचा-याचे अंशदान अधिक शासन अनुदानातून दिले जाणारे नियोक्त्याचे अंशदान अधिक व्याज) कोणतीही रक्कम कर्मचा-याच्या सेवा कालावधीत काढून घेता येणार नाही. तथापि कर्मचा-याचा अकाली मृत्यू झाल्यास अथवा कर्मचा-याने सेवात्याग करण्याचा निर्णय घेतल्यास असा स्वरूपाच्या प्रकरणी सेवांत लाभ देण्यासंबंधीच्या तरतूदी संदर्भात वित्त विभागाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यामधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू राहतील.

२१. जेव्हा एखाद्या विद्यापीठे किंवा मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/ औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यातील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याचे स्थलांतरण झाल्यास संबंधित कुलसचिव/प्राचार्य यांनी संबंधित कर्मचा-याच्या शेवटच्या वेतन प्रमाणपत्रात निवृत्ती वेतन लेखा क्रमांक व ज्या महिन्यापर्यंत त्या कर्मचा-याचे अंशदान परिभाषित योजनेसाठी जमा करण्यात आलेले असेल तो महिना व इतर बाबी स्पष्टपणे दर्शवाव्यात व स्थलांतर पूर्व कार्यालयातील अधीक्षक वेतन पथक यांना आवश्यक ते बदल करण्यास प्रस्तावित करतील. विद्यापीठ/महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण

संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यातील अधीक्षक वेतन पथक (स्थलांतर पूर्व) हे संबंधित कर्मचा-याच्या निवृत्ती वेतन लेखा क्रमांका संबंधीची सर्व माहिती स्थलांतर झालेल्या ठिकाणचे विद्यापीठ/महाविद्यालय यांच्या कार्यालयातील अधीक्षक वेतन पथक यांना तात्काळ कळवतील व ते नमुना आर- १ मध्ये आवश्यक त्या बदलाच्या नोंदी घेतील.

२२. अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यामधील १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना एकदा दिलेला निवृत्ती वेतन लेखा क्रमांक कोणत्याही परिस्थितीत बदलणार नाही. याबाबत वित्त विभागाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या सूचनांचे पालन करावे.

२३. अनधिकृत अनुपस्थिती, असाधारण रजा इत्यादी प्रकरणी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे अंशदानाची वसुली करण्यात येऊ नये. जर एखादा कर्मचारी देय व अनुज्ञेय रजेवर असेल किंवा निलंबनाधीन असेल व निर्वाह भत्ता घेत असेल तर अशा प्रकरणी ज्या वेतन देयकाव्दारे अशा कालावधीचे रजावेतन/निर्वाह भत्ता काढण्यात येत असेल त्या वेतन देयकातून/निर्वाह भत्याच्या देयकातून अंशदानाची नियमित वसुली करण्यात यावी.

२४. या योजनेखालील कर्मचा-यांच्या वसुलीच्या भरणाबाबतची एकत्रित माहिती नियोक्त्याच्या अनुरुप अंशदानाबाबतची माहिती तसेच देण्यात आलेल्या व्याजाबाबतची माहिती शिक्षण विभागाने राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे वेळच्या वेळी पाठवावी.

२५. नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेसंबंधी वित्त विभागाचे वेळोवेळचे निर्गमित होणारे शासन आदेश/निर्णय अकृषि विद्यापीठे व मान्यता प्राप्त अशासकीय महाविद्यालये/ तंत्रशास्त्र, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था/व्यवसाय शिक्षण विभागांतर्गत अनुदानित तंत्रशाळा/प्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये तसेच राज्यातील ज्या शासन अनुदानीत अभिमत विद्यापीठांना सेवानिवृत्ती योजना लागू आहे अशी अभिमत विद्यापीठे यांच्या १००% अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना योग्य त्या फेरफारासह लागू राहतील.

२६. या शासन निर्णयातील प्राचार्य संज्ञेमध्ये विज्ञान संस्था व न्यायसहाय्यक विज्ञान संस्था यांच्या संचालकांचा अंतर्भाव असेल.

२७. ज्या कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च विद्यापीठाच्या स्वनिधीतून करण्यात येतो अशा अशा पदावरील कर्मचाऱ्यांना सदर योजना लागू नाही.

२८. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : अनौसं ४१/११/सेवा ४, दिनांक ४-३-२०११ अन्वये त्या विभागाने दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

२९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यैंत आला असून त्याचा संकेतांक २०११०३२५१६४१२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

.स्वाक्षरी/-

(रा. गो. जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे कार्यालय, मलबार हिल, मुंबई,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलगुरु,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव,
कुलसचिव, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था, पुणे,
कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा परिक्षा)-१ महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ नागपूर, मुंबई (५ प्रती),
संचालक, लेखा व कोषागारे, (५ प्रती),
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
संचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण अधिकारी,
सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
मा. राज्य मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
सर्व सह सचिव/ उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग,
वित्त विभाग, (सेवा-४ / सेवा-९ / कोषा -५ / व्यय-५) ,
निवड नस्ती.